# भारतीय जनता पक्ष

(केंद्रिय कार्यालय)
11, अशोक रोड, नवी दिल्ली- 110001
फोनः 011-23005700, फॅक्स- 011-23005787

# भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ता आणि खासदार श्री प्रकाश जावडेकर यांचे प्रसिद्धिसाठीचे वक्तव्य

युपीए सरकारच्या शासनकाळात जंगी आर्थिक गोलमाल झाला असून आणखी एका घोटाळ्याचा पर्दाफाश झाला आहे. कर्जमाफीला पात्र असलेल्या 34 लाख शेतक-यांना या योजनेचा लाभ मिळाला नाही, ज्यामुळे कर्जमाफीने पात्र नसलेल्या 24 लाखपेक्षा अधिक शेतक-यांना या योजनेचा लाभ मिळाला आहे. याबाबतचा कॅग चा अहवाल हा डोळे उघडणारा आहे. भाजप या घोटाळ्याची त्वरित सीबीआय तपास चौकशीची मागणी करत आहे.

कॅग कडून सध्या तरी 3.5 करोड खात्यांपैकी फक्त 90 हजार खात्यांचा तपास करण्यात आला आहे. या लहान नमुन्यातून कॅगला 13 टक्के एवढेच शेतकरी सापडले ज्यांना खरोखर कर्जमाफीची आवश्यकता आहे, त्यांना या योजनेचा लाभ मिळाला नाही.8.5 टक्क्यापेक्षा अधिक शेतकरी जे कर्जमाफीसाठी पात्र नसतील त्यांना या योजनेचा लाभ मिळाला आहे. त्यात कदाचित असेही लोक असतील जे शेतकरी नाहीत. अशा लाभार्थींची संख्या मोठी असल्याची शक्यता आहे. भाजप अशी मागणी करत आहे की कर्जमाफीचे पात्र असलेल्या सर्व शेतक-यांना 31 मार्च 2013 पर्यंत बाकी रक्कम दिली पाहिजे.

कॉग्रेस आता भ्रष्टाचाराचा पर्याय बनली आहे. राष्ट्रकूल स्पर्धा घोटाळा, कोळसा घोटाळा, टु-जी स्पेक्ट्रम घोटाळा, हेलिकॉप्टर घोटाळा आणि आता शेतक-यांचा कर्जमाफी घोटाळा बाहेर पडला आहे. ज्यामुळे सरकारी तिजोरिला अनेक कोटी रुपायांचा फटका बसला आहे. मूळ योजनेत फेरफार करत अनेक लहान आणि अल्प श्रीमंत असलेल्या शेतक-यांना लाभ मिळाला नाही. वास्तविकता वर्ष 1997 नंतरच्या लहान आणि अल्पश्रीमंत शेतक-यांना योजनेचा लाभ मिळायला पाहिजे होता. त्यातील अनेक शेतक-यांना अनेक कष्ट करुन

मोठ्या त्रासाने कर्जाची भरपाई करावी लागली आणि कर्जमाफीचे पात्र झाल्यानंतर त्या योजनेचा लाभ मिळाला नाही.

आघात होण्यासारखी घटना ही आहे की, मायक्रो फायनान्स ईन्स्टीट्यूट कर्जमाफीला पात्र नसणा-यांना त्याचा लाभ देण्यात आला आहे. कॅगच्या अनेक प्रकरणात फेरफार,लिखाणात बदल अशा प्रकारचे अनेक घोटाळे करण्यात आले आहेत. कॅगच्या अंदाजानुसार कर्जमाफीचे पात्र ठरलेल्या सहा टक्के शेतक-यांना त्याचा फायदा देण्यात आलेला नाही. कर्जमाफीचे प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही. भाजप अशी मागणी करत आहे की, तपासात ही बाब समोर आली पाहिजे की, संपूर्ण घोटाळ्याला जबाबदार कोण आहे....दोषीं विरुद्ध कडक कारवाई केली गेली पाहिजे.

कर्जमाफीनंतर देखील कृषिक्षेत्रात परिस्थिती वाईट आहे. अनेक शेतक-यांना आत्महत्या करावी लागेल अशी परिस्थिती आहे. कृषि आधारित बजेट लोप पावत आहे, कारण खते, जंतूनाशक औषधे, बियाणे, पाणी, वीज आणि डिझेलच्या दरात कमालीची वाढ झाली आहे. मिनीमम सपोर्ट प्राईज आणि पीक उत्पादन यांच्यातील तफावत वाढली आहे. भाजप स्वामिनाथन आयोगाच्या फॉर्म्युल्यानुसार उत्पादन खर्चाची भरपाई प्लस 50 टक्के देण्याची मागणी केली आहे.

(रामकृपाल सिंन्हा)

मानद मंत्री,भाजप संसदीय पक्ष